बातमीपत्र

# पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

## माहिती कक्ष, दि १८ ऑक्टोबर २०२३

## जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४०१/२०२३ भादवि ३७९,५०६,५०४,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १७/१०/२०२३ रोजी मार्केट यार्ड सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १७/१०/२०२३ रोजी २०.२९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | शिवलिंगप्पा शिवशरणप्पा चिंचोळी,वय-४३ वर्षे,रा- चौडेश्वरी मंदिर जवळ मुपो वळसंग ता.दक्षिण सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | | १,३०,०००/- रू त्यात विविध दराचे भारतीय चलनी नोटा |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की,वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व त्यांचे मालक हे त्यांची कार क्र एमएच १३ एएन ८९७६ यामधून मार्केट यार्ड येथे किराणा माल व इतर साहित्य खरेदी करण्यासाठी यातील फिर्यादी व फिर्यादीचे मालक वरील ठिकाणी येऊन कार पार्क करीत असतना यातील अज्ञात इसमाच्या गाडीला फिर्यादी चालवित असलेल्या गाडीचा कट लागून त्यांच्या मो.सायकल चे बंपर तुटले.तेव्हा यातील मो.सायकलवर असलेल्या एक लाल शर्ट घातलेला अंदाजे २८ वयाचा डावे बाजूस टक्कल असलेला इसम तसेच एक पिवळा शर्ट घातलेला काळा सावळा बुटका असे दोन इसमांनी फिर्यादीस नुकसान भरपाई दे असे म्हणून फिर्यादीस शिवीगाळ करून आम्हाला ५ हजार रूपये दे असे म्हणू लागल्यावर फिर्यादी त्यांना मी गाडीचा ड्रायव्हर आहे थांबा मी मालकाकडून पैसे घेवून येतो असे म्हणून गाडीचा दरवाजा लॉक न करता तसेच गेले असता यातील नमुद वर्णनाचे इसम यांनी फिर्यादीचे गाडीत कॅबीन मध्ये ड्रायव्हर शीटच्या पाठीमागे ठेंवलेली १,३०,०००/- रू ची पैश्याची छोटी पिशवी मुद्दाम लबाडीने फिर्यादीचे संमतीवाचुन चोरून नेली आहे.म्हणून.तपास- सपोनि सोनवणे- **७५८८००१८१८** |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५९२/२०२३ भादवि ४५२,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १६/१०/२०२३ रोजी १८.३० वा चे सुमारास फिर्यादीचे राहते घरी सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १७/१०/२०२३ रोजी ०२.४९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सुनिता अर्जुन सुरवसे ,वय-४९ वर्षे,रा- १२६ अ सहस्त्रार्जुन नगर जुळे सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) सोनाली सुरज सुरवसे २) शशीकला ३) सोनालीची मामी मनीषा ४) कार चालक पुर्ण नाव माहित नाही. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि १६/१०/२०२३ रोजी १८.३० वा चे सुमारास फिर्यादीचे राहते घरी सोलापूर येथे यातील फिर्यादी ही अंगणामध्ये लहान मुलाला घेवून बसले असता फिर्यादीची सुन यातील आरोपी क्र १ ही व आरोपी क्र २ ते ४ हे सर्वजण घरामध्ये येवून फिर्यादीचा मुलगा कोठे आहे असे म्हणुन सर्वजण फिर्यादीचे घरात घुसले व आरोपी क्र १ हिने कपाट उघडून कपाटामधील काही पैसे सोन्याचे दागिने असलेली पिशवी व कागदपत्रे असलेली फाईल घरातून घेवून जात असताना फिर्यादीने तिला तु काय घेवून जात आहे असे विचारले असता त्यावेळेस अरोपी क १ ही फिर्यादी जवळ येवून तु घरातून निघून जा नाहीतर तुझ्या मुलावर खोटा गुन्हा दाखल करून त्याची नोकरी घालवते असे म्हणून फिर्यादीस सर्वजण मिळून हाताने मारहाण करून शिवीगाळ केली आहे.म्हणून.तपास- पोह/११८७/फुलारी- |